# बाल रंगभूमी

४

## शाम फडके

म. ग्रं. सं. ठाणे
विषय ना. ना.
वा. क्र. १६८६८




IRBK-0116868
IRBK-0116868

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुमार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[क्र. मा. प.]

# बालरंगभूमी

भाग ४ था

नाट्याभिनयाचे खेळ

पुतळा, ताल, दमछाट

आणि

दोन ऐतिहासिक प्रवेश

लेखक

श्याम फडके

IRBK-0116868

IRBK-0116868

राजचंद्र प्रकाशन, ठाणे २

प्रकाशक :

श्री. श्याम फडके

राजचंद्र प्रकाशन

इंदिरा निवास, नौपाडा

ठाणे ४०० ६०२

© श्याम फडके १९७५

प्रथमावृत्ती दसरा १९७५

मुखपृष्ठ : रमेश मुधोळकर

सूचना : या पुस्तकातील प्रवेश विनापरवानगी करणे
हा कायदेशीर गुन्हा आहे याची नोंद घ्यावी.

[ सरकारी स्वस्त कागदाचा
या पुस्तकात वापर केलेला आहे.]

मुद्रक :

श्री. र. भ. निगुडकर

३९५/४ सदाशिव पेठ

पुणे ४११०३०

# पुतळे

मुलांनो, तुम्ही स्टॅच्यू (Statue) हा खेळ खेळता. तो तुम्हाला फार आवडतो. विशेषतः एखादा मुलगा पळत असताना किंवा घाईगडबडीत असताना त्याला स्टॅच्यू करणं तुम्हाला फार आवडतं. नाटकात काम करू इच्छिणाऱ्या मुलांनी हा खेळ जरूर खेळावा. कारण बरेच वेळा नाटकामध्ये एखाद्या पुतळ्यासारखं बराच वेळ उभं राहायचं असतं. कधीकधी पंधरा-वीस मिनिटं सुद्धा. तुम्हाला एक गंमत सांगतो. एका मुलानं नाटकात बागेतल्या पुतळ्याचं काम केलं. बिचारा बराच वेळ उभा होता. पण तेवढ्यात एक डास त्याच्या पायाला चावायला लागला. आता आली का पंचाईत ? शेवटी त्यानं डास मारला आणि तो पुन्हा पुतळा झाला पण तेवढ्यात प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या. तसंच एकदा एक मुलगा लढाईत मेला असं दृश्य होतं. तो मेलेला मुलगा रंगमंचावर असा पडला होता की त्याचं तोंड प्रेक्षकांकडे नव्हतं. त्याला हे माहित होतं. त्यामुळे त्याने हळूच डोळे उघडले, तो समोरून एक उंदीरमामा त्याला त्याच्याकडे येताना दिसला.

मग काय ! तो (नाटकात) मेलेला मुलगा ताडकन उठून बसला. अशी गंमत.

मग आता आपण हा खेळ कसा खेळणार ? बघा.

पुढील पुतळे तयार करा–

(१) एका पायावर उभा राहणारा माणूस.

(२) हाताची मागे घडी आणि पुढे जास्तीत जास्त वाकणारा.

(३) लवंडलेला माणूस.

(४) स्तब्ध उभा माणूस.

(५) नर्तकाच्या भूमिकेतला माणूस.

(६) रस्त्यात पडलेली वस्तू उचलणारा माणूस.

(यासाठी योगासनं फार उपयोगी पडतात, बरं का ! ती तुम्ही शिक्षकांकडून शिकून घ्या.)

स्वस्थ बसायला शिका.

हालचाल न करता उभे राहा.

नंतर आकडे मोजा. रोज वेळ वाढवत न्या.

आता–

रंगमंचावर बऱ्याच मुलांनी पी. टी. चे हात करावेत. त्यांना एका मुलाने अर्धा मिनिट स्टॅच्यू द्यावा. प्रत्येक स्टॅच्यूला मार्क

द्यावेत. नाचताना, चालताना, हसताना, रडताना स्टॅच्यू द्यावेत.

बघा, कोण जास्त मार्क मिळवतो ते. वाटतं तितकं ते सोपं नाही हं.

## ताल

मुलांनो, नाटकात काम करणाऱ्या मुलाचा आवाज नीट ऐका. एखाद्याचं बोलणं इतकं भरभर असतं की काही समजत नाही. तर एखादा असं काही विचित्र बोलतो की त्याचं बोलणं ऐकवत नाही. हे सगळे बोलण्याचे दोष आहेत बरं ! ते घालवण्यासाठी अनेक उपाय आहेत. पण आज आपण एक साधा खेळ पाहू की, ज्यामुळे एखाद्याचं बोलणं भरभर असेल तर ते नीट होईल. चला. हा खेळ सगळ्यांनी खेळायचा आहे बरं. करा सुरुवात. मी खाली काही वाक्यं दिली आहेत, ती सगळ्यांनी टाळ्या वाजवून म्हणायची.

एक दोन तीन चार
घरात झालेत उंदीर फार.

आता या टाळ्या सावकाश देऊन वाक्य म्हणा. नंतर भरभर देऊन वाक्य म्हणा. मात्र प्रत्येक दोन टाळ्यांतली वेळ सारखी ठेवा.

आता इथेच तुम्हाला एक गंमत सांगतो. वरच्या वाक्यात ' झालेत ' या शब्दाऐवजी ' फिरताहेत ' हा शब्द घालून पाहा. तो शब्द नीट टाळीवर येण्यासाठी ' फिरताहेत ' हा शब्द चालणार नाही. तोच शब्द घ्यायचा झाला तर ' फिर्तात ' असं म्हणावं लागेल. म्हणजेच प्रत्येक शब्दाला मात्रा असतात; त्या लक्षात घेऊन आपण बोललं तर तो शब्द कानाला आवडतो. चला पुढे.

दोन तीन चार पाच
चल रे मोरा, नाच रे नाच
तीन चार पाच सहा
बाळोबाची गंमत पाहा.
चार पाच सहा सात
मंदाला हवा साखरभात
पाच सहा सात आठ
तुझ्या शेंडीला मोठी गाठ
सहा सात आठ नऊ
आपण सारे गंमत पाहू
सात आठ नऊ दहा
माकडा माकडा इकडे पाहा.

आता यामध्ये तुम्ही शब्द बदलून बघा. नीट शब्द बसला नाही तर तुम्हालाच कसरत करावी लागते.

तालासाठी पुढील ओळी निरनिराळ्या वेगानं म्हणा–

एक दोन तीन
इन मीन तीन
सुरेखसा सीन
पाहिलास यतीन ?

पाहा पाहा पाहा
चार पाच सहा
आणखीन पाहा
आठ नऊ दहा
तू घे चहा
माझ्याकडे पाहा
सकाळीच नहा
खट्याळ महा

हॅ हॅ हॅ
टचॅ टचॅ टचॅ (अर्थहीन शब्द
डचॅ डचॅ डचॅ तालावर म्हणा)
म्यॅ म्यॅ म्यॅ

डान्यूब्ब, टान्यूब्ब, मान्यूब्ब, कीट्टी–
डिमडोण, टिमडोण, लिमलोण, विट्टी
टिपटॉप डीबडॉब बीबबॉब मिट्टी
टींगटींग शींगशींग वींगवींग शिट्टी–

## दमछाट

मुलांनो, ऐतिहासिक नाटकात बरेच शब्द असलेली वाक्यं एका दमात न थांबता म्हणावी लागतात. चांगल्या नटाची ती एक कसोटी आहे. त्यासाठी दमछाट शिकणं जरूरीचं आहे. चला, त्यासाठी आपण एक सोपा खेळ खेळू.

खेळ खेळणाऱ्यांनी वर्तुळाकार बसावं. एका मुलानं एखादं वाक्य म्हणावं. उदा. मी मुंबईला जाणार आहे. पुढच्या मुलानं यात एक शब्द वाढवावा. उदा. मी उद्या मुंबईला जाणार आहे. मी उद्या राजूबरोबर मुंबईला जाणार आहे (६). मी उद्या राजूबरोबर सकाळी मुंबईला जाणार आहे (७). मी उद्या राजूबरोबर सकाळी नक्की मुंबईला जाणार आहे (८).

अशा तऱ्हेने वाक्य वाढवीत न्यावं. कोण जास्तीत जास्त शब्दांचे वाक्य म्हणतो ते पाहू. तुम्हाला प्रॅक्टिससाठी माझ्याच

एका नाटकातलं एक वाक्य देणार आहे. बघा प्रयत्न करून, एका दमात म्हणता येतं का ते ?

मालवणकर कुलोत्पन्न सुविद्य, सुशील, सौभाग्यकांक्षिणी स्वरूपा मालवणकर या आपल्यापैकी एखाद्या सुविद्य, सुशील, सविनय अशा तरुणाची निवड करून त्याच्याशी विवाहबद्ध होऊन मालवणकर घराण्याचे नाव, गाव व कीर्ती तसंच या पुण्यनगरीचं पुण्य वर्धित व्हावं ही इच्छा मनात धरून उचापती आणि कंपनीचे मालक वासुअण्णा मालवणकर यांनी मागविलेल्या ४११ अर्जांतून निवड केलेल्या चार अर्जदारांतले आपण तिघे त्याच पवित्र कामासाठी इथे हजर झाला आहात. (एकूण साठ शब्द. नाटक 'तीन चोक तेरा')

वरील वाक्य एका दमात म्हणणारे कलाकार मी पाहिले आहेत.

मुलांनो, करा प्रयत्न. मात्र नुसतं धडधड म्हणून चालणार नाही. तर यातला अर्थही प्रेक्षकांपर्यंत पोचला पाहिजे. हे वाक्य पोथीसारखंही म्हणायचं नाही. नेहमीच्या वाक्याप्रमाणेच पण एवढं लांबलचक वाक्य एका दमात म्हणण्याची सवय ठेवा.

●

मागच्या तीनही भागांत मी एकेक ऐतिहासिक प्रवेश दिला होता. त्या प्रवेशातून शिवाजीची प्रगती कशी होत गेली हे दाखवलेलं आहे. आता या पुस्तकात मी पुढचे दोन प्रवेश देत आहे. यातल्या पहिल्या प्रवेशात एक कल्पनाविलास आहे. जुन्या इतिहासाचा बालशिवबाच्या मनावर काय परिणाम झाला असेल या कल्पनेनं प्रवेश लिहिलाय. याचं नाव—

## बालशिवबाचे विचार

पात्रे तीन– (१) निवेदक

(२) बाळराजे शिवाजी

(३) दादोजी कोंडदेव

निवेदक : बालशिवबा न्याय शिकू लागला, तेव्हाची गोष्ट. आसवलीच्या पाटलाचा न्याय-निवाडा. पंत दादोजी कोंडदेव कसा करतात ते त्यानं पाहिलं. फिर्याद दत्ताजी ढमाळ याच्याविरुद्ध होती.

पंतजींनी दत्ताजी ढमाळच्याच्या बाबतीत सग चौकशी करून तो गुन्हेगार आहे हे सिद्ध झाल्यावर ढालाईत पाठवून त्याला हुजूरदाखल केलं आणि गोतपंचायतीसमोर

चौकशी करून न्याय-निवाडा केला. त्याच्या पायात बेडी ठोकली आणि रूपाऊला तिच्या हक्काची पाटीलकी मिळवून दिली. पंतांप्रमाणे आईसाहेबही न्याय देण्यासाठी सदरेवर बसत आणि न्याय देत. दोघांच्या कारभाराचा शिवबावर योग्य तो परिणाम होत होता. त्याच्या रक्तात न्याय उतरत होता. पण त्यामुळेच आता जागोजागी त्याला अन्याय दिसत होता. बादशहाची सत्ता हा आपल्यावरचा सर्वांत मोठा अन्याय याची त्याला जाणीव होऊ लागली. याच वेळेला शिवबाचं लग्न झालं. १६ मे १६४० या लग्नाला महाराजसाहेब म्हणजे शहाजीराजे आले नव्हते. त्यामुळे आपल्या वडिलांच्या दर्शनाला शिवबा बंगळूरास गेला. तेथून विजापूर दाखवण्यासाठी राजांनी शिवबाला विजापुरात पाठवले. शिवबाचे डोळे निराळंच काही पाहत होतं. त्याचं मनही निराळ्याच विचारांत गुंतलं होतं.

(निवेदक जातो आणि प्रवेश सुरू होतो. बाल-शिवबा विचारग्रस्त असताना बाहेरून पंत दादोजी कोंडदेव येतात. महाराजांना मुजरा करतात, आणि–)

दादोजी : राजे, आपल्या विचारांत अधिक्षेप होत नसेल तर मी

एक विचारू ?

शिवाजी : अवश्य.

दादोजी : बंगळूर आणि विजापूरला भेट दिल्यापासून आपल्याला अस्वस्थता आल्यासारखं मला वाटतंय. काही प्रयोजन ?

शिवाजी : पंत, आमचा तुम्हालाच या बाबतीत एक सवाल आहे.

दादोजी : सवाल ?

शिवाजी : होय. तुम्ही आम्हाला बंगळूरला नेलंतच कशाला ? का ?

दादोजी : म्हणजे काय राजे ? आता आपण या जहागिरीचा कारभार पाहू लागलात, त्याचा हकीकतनामा महाराजसाहेबांपुढे नको का मांडायला ? शिवाय आपल्या विवाहाला महाराजसाहेब येऊ शकले नाहीत. या सगळ्या गोष्टींसाठी म्हणजे मुख्यत: महाराजसाहेबांच्या भेटीसाठी आपल्याला बंगळूरास नेले होते. त्यांच्या भेटीची इच्छा होती ना ?

शिवाजी : पंत, तेवढा एकच आनंद मिळाला. आम्हाला आमचे महाराजसाहेब भेटले आणि इतक्या दिवसांची आमची ती तमन्ना पुरी झाली. पंत, आम्ही लहान असल्यापासून

आम्हाला नेहमीच एक दुःख होत आलंय की, आमचे महाराजसाहेब आमच्याजवळ नाहीत. पंत, आम्ही आमच्या दोस्तमंडळींबरोबर खेळत असताना ते आम्हाला हाच सवाल विचारत की तुमचे महाराजसाहेब आहेत कुठे ? ते इथं का येत नाहीत ? ते तुम्हाला का भेटत नाहीत ? आईसाहेबांच्या तोंडून त्यांच्या हकीकती ऐकल्या की वाटायचं, आपण त्यांच्याजवळ जावं; त्यांच्याशी बोलावं.

पंत : याचसाठी आपल्याला बंगळूरला नेलं, राजे.

शिवाजी : नाही–आमचा सवाल तुम्हाला समजला नाही, पंत–

पंत : म्हणजे ?

शिवाजी : पंत, बंगळूरचा प्रदेश म्हणजेच पूर्वीचा वैभवशाली प्रदेश ना ! विद्यारण्याच्या आशीर्वादाने विजयनगरचं वैभव वाढवणाऱ्या हरिहर आणि बुक्कराय यांचीच वास्तू ना ती ! ते अच्युतराव, ते हरिहरराय यांच्या कुशल कर्तृत्वाची कूस ना ती ! पंत, आम्हाला तो इतिहास आपणच शिकवलात ना !

पंत : राजे, इतिहास शिकून शहाणे व्हायचं असतं. झाल्या गोष्टीबद्दल खंत जरूर वाटावी, पण दुःखाचे कढ आणू नयेत.

नाही तर माणसाची प्रगती व्हायची नाही.

शिवाजी : पंत, खंत इतिहासाची नाही. खंत वाटते आमच्या नाकर्तेपणाची. आज इतकी वर्षे आम्ही षंढाचं जीणं जगतो आहोत याची लाज वाटते. आईसाहेबांनी आम्हाला लहानपणी राम, कृष्णाच्या कहाण्या सांगितल्या तेव्हापासून आम्हाला प्रत्येक वेळी वाटत आलंय की, इथं पुन्हा राम का जन्माला येत नाही ? इथे एखादा अर्जुन का निघत नाही ? पंत, आता वाटतं की, त्या परमेश्वरालासुद्धा कौरवांचीच ओढ असावी.

पंत : राजे, काय बोलता आपण ? आई भवानीनं जर हे शब्द ऐकले तर ती काय म्हणेल ?

शिवाजी : आमचे शब्द ऐकण्यासाठी ती राऊळात आहेच कोठे ? तिचं अस्तित्व आम्ही ठेवलंच कुठं ? उघड्या डोळ्यांनी आम्ही आमच्या देवळांच्या मशिदी करू दिल्यावर आम्हाला परमेश्वराजवळ प्रार्थना करायचा अधिकारच कोणता, पंत... ? बंगळूरातून फिरत असताना रस्त्यात आम्ही एकदम दचकलो एकदा.

पंत : काय सांगता, राजे ?

शिवाजी : पंत, आम्ही त्या खांबाकडे बघत बसलो. माझा माझ्यावर विश्वासच बसेना. त्या खांबावरून माझ्याशी कोणीतरी बोलत होतं.

पंत : कोण बोलत होतं, राजे ?

शिवाजी : ज्या निजामशहाने रामराय यादवांचे मस्तक भाल्यावर उभं करून ठेवलं होतं त्या रामरायाचा आत्मा माझ्याशी बोलत होता. मला ओरडून सांगत होता, 'तू त्याचा सूड घे–तू त्याचा बदला घे.' मला पाहिल्यावर तो माझ्याजवळ आला आणि म्हणाला, 'नीट डोळे उघडून माझे हाल बघ. लक्ष ठेव, माझी ही स्थिती होण्यासाठी तुझे मराठा सरदारच त्या खानाच्या बाजूनं लढले...'

पंत : काय सांगता, राजे !

शिवाजी : ते पाहिल्यापासून आम्हाला झोप नाही. बंगळूरला महाराजसाहेबांना भेटण्याची आमची स्वप्नं पुरी झाली, पण त्या स्वप्नांनी आम्ही बेचैन झालोत. आज ७०-८० वर्षे तो रामरायाचा आत्मा त्या भाल्याच्या टोकावर तळमळतोय .. दुष्ट शार्दूलमर्दन हिंदुराय राजा रामरायाचा आत्मा.

पंत : राजे, ज्या विजयनगराच्या वैभवाचा इतिहास आम्ही तुम्हाला शिकवला त्याच विजयनगरचा नाश न शिकवताच आपण शिकलात. महाराजसाहेबांनी बंगळूरास केलेल्या आमच्या कामगिरीच्या गौरवापेक्षा आपल्याला ही नजर मिळाली त्यात मी जास्त गौरव मानतो. राजे, तिथं आपण विरूपाक्ष शंकराच्या मंदिरात आईसाहेबांच्या बरोबर गेला होतात तेव्हाच आपल्या चेहऱ्यावर मी काही निराळं पाहिलं होतं. आपलं लक्ष देवळात नव्हतं तर देवळाच्या उध्वस्त भागाकडे होतं. त्या खांबावरच्या रामरायाच्या आत्म्याप्रमाणेच त्या मंदिरातला प्रत्येक भाग आपल्याशी बोलला असेल.

शिवाजी : आणि तरी पंत, तुम्ही मला अस्वस्थ झाल्याबद्दल विचारता ?

पंत : राजें, माझी जबाबदारी फार जोखमीची. स्वराज्याचं शिवधनुष्य पेलवायला तुम्हाला शिकवायचं. राजे, माझं भाग्य एवढंच की माझ्यासारख्या सामान्य माणसाला ही सोन्याची संधी मिळतेय...पण त्यासाठीच ही काळजी. राजे, आपण बंगळूराहून विजापूरला गेलो. तिथंसुद्धा तुमच्या मनात

काय वादळ चाललं असेल याची मला कल्पना होतीच. तिथंसुद्धा–

शिवाजी : पंत, तुम्ही न शिकवता त्या विजापूरच्या दार उस सलतनतीनं बरंच काही आम्हाला शिकवलं. तिथल्या चिरे-बंद तटबंदीनं बऱ्याच कहाण्या सांगितल्या. तो विजापूरचा मक्का दरवाजा माझ्याशी बोलला. ती प्रसिद्ध मुलुखमैदान तोफ तर माझ्या कानात महामंत्र सांगून गेली. पंत, विजा-पूरच्या रस्त्यारस्त्यांत तर एक चेहरा माझा सारखा पाठ-लाग करत होता.

पंत : एक चेहरा ?

शिवाजी : हं ! तो मुरार जगदेवाचा चेहरा–

पंत : मुरार जगदेव !

शिवाजी : होय, मुरार जगदेव ! पाय ठेवावा तेथे मुरार जगदेव दिसत होता. विजापूरच्याच सलतनतीचा एक शूर मातबर, नेकीचा सरदार ना ! पंत, या मुरार जगदेवानीच अदिल-शहाच्या संरक्षणासाठी ती प्रसिद्ध मुलुखमैदान परिंड्याहून विजापूरला आणली ना ? हाच मुरार जगदेव सुलतानी-साठी रक्त ओकत होता, घाम गाळत होता ना ? काय

केलं त्याचं अदिलशहाने ? सांगा ना !

पंत : बादशहाने त्याला कैद करून जीभ छाटून विजापुरात धिंड काढली आणि त्याचे तुकडे तुकडे करून त्याला ठार मारलं.

शिवाजी : त्याचा अपराध ?

पंत : तो प्रामाणिक होता हाच--

शिवाजी : पंत, प्रामाणिकपणाचे पारितोषिक हेच ना ! वाटतं, उद्या अशीच वेळ आमच्या महाराजसाहेबांवर आली तर!

पंत : राजे !

शिवाजी : आमची चूक झाली, पंत ?

पंत : नाही, राजे.

शिवाजी : पंत, सांगा तसं होणार नाही ! तसं झालं तर इतिहास ती चूक शत्रूची मानणार नाही. ती चूक आमची ठरेल; आमच्या अदूरदर्शीपणाची !

पंत : राजे, महाराजसाहेब बादशहाच्या नोकरीत आहेत याची खंत आपल्याला वाटते याची मला कल्पना आहे. पण याबाबतीत त्यांचाही निरूपाय आहे. त्यांनीही स्वतःचं राज्य स्थापण्यासाठी पाच-सहा वर्षं जिवाचं रान केलंच ना ! राजे, त्यांना अपयश आलं. पण लक्षात ठेवा, त्यांचं अपयश तुमच्या

यशासाठी पाया ठरावं. त्यासाठी त्यांनी विजापूरहून आपण इथे आल्यावर मुजुमदार, डबीर, सबनीस, पेशवा तुमच्यासाठीच करून दिलेत ना ! राजे, आपण कर्ते व्हा आणि स्वराज्य स्थापा. जे काम महाराजसाहेबांना जमलं नाही ते तुम्ही करा. तुम्हाला ते शक्य आहे. बारा मावळांत फिरा. परमेश्वरापुढे शपथ घ्या. नागेश्वराचा कौल घ्या आणि कार्याला लागा.

शिवाजी : आज्ञा, पंत. आम्ही आपल्या शब्दाबाहेर नाही.

( जातात. काळोख. )

## प्रवेश दुसरा

## बाळराजे आणि न्याय

**पात्रे तीन**

(१) निवेदक

(२) बाळराजे

(३) दादोजी कोंडदेव.

या प्रवेशात भवानीमातेची मूर्ती अपेक्षित आहे. नसल्यास विंगचा उपयोग करावा.

(निवेदक येऊन बोलू लागतो.)

निवेदक : प्रेक्षकांनो, शिवबाचे गुरू दादोजी कोंडदेव. या गुरूंनी आपल्या चेल्याला तयार करण्यात कोणतीही कसूर ठेवली नव्हती. आणि हा चेलाही वस्ताद होता. आपल्या मनात शिवबा कसा व्हावा अशी कल्पना पंत करीत आणि त्यांच्या कल्पनेपेक्षा जास्तच शिवबा तयार होत होता.

त्यामुळं पंतांनाही समाधान वाटू लागलं. शिवबा हळूहळू बंडखोर होत होता. त्यासाठी त्याची तयारी सुरू झाली. पातशहाच्या जहागिरदाराचं पोर हलक्या आणि उनाड पोरांत मिसळू लागलं, अशा बातम्या विजापूरच्या दरबारी माणसांच्या कानाशी पोचू लागल्या. शिवबानं तिकडं दुर्लक्ष केलं. त्याचं लक्ष आता माणसं मिळविण्याकडे होतं. जुन्या माणसांपेक्षा नव्या रक्ताची–ताज्या दमाची तरुण पोरंच त्याला हवी होती. कारण जुनी माणसं सबुरीचा पोक्त विचार करीत. शिवबाला आता सबुरी नको होती. त्याला हवी होती शिरजोरी. त्या माजलेल्या रेड्याशी लढणारी पोरं हवी होती. गरम रक्ताची, गरम माथ्याची. एकदा डोक्यात वारं भरून दिलं की बस ! काम फत्ते

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६८६८ नों. दि. ७/१२/९४
वि. बा/ना

झाल्याशिवाय परतायचीच नाहीत, अशी पोरं त्याला मिळत होती. आईसाहेबांच्या आणि पंतांच्या देखरेखीखाली त्याची बंडखोरी आता सुरेख बाळसं घेत होती. शिवबाच्या स्वभावानं त्याची दोस्तमंडळी वेडी होऊन गेली. त्याच्यावर त्यांची देवासारखी भक्ती जडली. त्याच्यासाठी आपलं काळीजसुद्धा कापून द्यायला तयार झाली. रात्री-अपरात्री, वाटेल तेथे ती आपला घोडा शिवबासाठी फेकू लागली. शिवबाही या पोरांवर भावासारखं प्रेम करी. या पोरांच्या मनातली बादशहाची भीती पार पुसून गेली आणि सगळ्यांच्या कानात शिवबाचं एकच वाक्य घुमू लागलं– 'इथे आपलं राज्य व्हावं ही श्रींची इच्छा आहे.' सारी स्वप्नं स्वराज्याची होती. पण या धुंदीमध्ये शिवबा आपलं स्वत्त्व विसरला नव्हता....तो आपल्या माणसांवर जिवापलीकडे प्रेम करी, गोड बोले. पण जर एखादे वेळेस काही कोणाच्या हातून विपरीत घडलं तर मात्र त्याची खैर ठेवीत नसे.
एके दिवशी तर– (शिवाजी आतूनच ओरडत येतो.)

शिवाजी : नाही, याला सुटका नाही. (पंत येतात.)

पंत : काय झालं, राजे ?

शिवाजी : पंत, ताबडतोब ढालाईत हशम रांझ्याला पाठवून द्या.

पंत : रांझ्याला ?

शिवाजी : होय, रांझ्याला. आणि तिथल्या बाबाजी बिन भिकाजी गुजर पाटलाला जेरबंद करून इथे दाखल करा. आत्ताच्या आत्ता.

पंत : काय झालं, राजे ?

शिवाजी : पंत, आपल्या जहागिरीतल्या या नराधम पाटलानं काय केलं हे ऐकलं नाहीत तुम्ही ?

पंत : नाही, राजे...

शिवाजी : पंत, त्या नराधमाचं दुष्कृत्य इतकं वाईट आहे की, त्याचा आम्हाला उच्चार करवत नाही. त्यानं एका बाई-वर नुसता हातच टाकला नाही, तर तिची अब्रू घेतली—

पंत : काय सांगता, राजे ?

शिवाजी : नाही पंत— पाटील हा गावचा अधिकारी. यानंच असे चाळे केले तर गावातल्या बाकीच्या माणसांकडून आम्ही चांगल्या वागणुकीची अपेक्षा कशी करावी ? नाही पंत, आपल्या राज्यात या माणसाला दया-क्षमा नाही. याला कडकच सजा झाली पाहिजे. आपल्या इथे परकी स्त्री ही

मातेसमान मानली जाते, मानायलाच हवी. तिचा अपमान आम्ही सहन करणार नाही. पंत, यासाठी ताबडतोब हशम रांझ्याला पाठवून त्याला इथं आणा. आम्ही रीतसर चौकशी करूच आणि गुन्हा शाबीत झाला तर त्याची पाटीलकी तर जप्त होईलच, पण त्याचे हातपायही कलम केले जातील. पंत, तशी व्यवस्था करा.

पंत : आज्ञा महाराज. ( जातात. )

शिवाजी : ( भवानीमातेशी ) नाही आईभवानी, माझ्या स्वराज्यात मी स्त्रीची प्रतिष्ठा कमी करू देणार नाही. स्वराज्याच्या जन्माच्या आधीच हे असले अधिकारी निघाले तर स्वराज्य मिळाल्यावर काय करतील ? नाही माते, तुझ्याप्रमाणेच स्त्री ही देवळातली देवता आहे. मग ती कोणत्याही जातीची असो वा धर्माची असो. स्त्री आम्हाला मातेसमानच आहे आणि आम्ही मातेसमानच मानणार.

(किंचित काळोख होतो. निवेदक पुढे येऊन बोलू लागतो.)

निवेदक : शिवबा असा घडत होता. त्याच्या प्रेमाबरोबरच, त्याच्या लोभाबरोबरच त्याचं तेज, त्याचा रागही त्याच्या संवगड्यांनी पाहिला. त्यांनाही त्याचा अभिमान वाटला.

त्यांनाही असाच तेजस्वी म्होरक्या हवा होता. बऱ्याच वर्षांत इथल्या मातीनं हे तेज पाहिलं नव्हतं. कारण सगळ्यांनी स्वाभिमान खुंटीलाच टांगून ठेवला होता. म्हणून हे तेज सहन होत नव्हतं. बादशहाला जगदीश्वर मानून रोज त्याला नमस्कारच काय, तर त्याच्या पायाचं तीर्थ घेणारी माणसंच बरीच झाली होती. दिल्लीचा बादशहा जगदीश्वर झाला तर विजापूरचा इब्राहीमखान जगद्गुरू बनला. हे जगद्गुरू मात्र गोडगोड बोलून आपलं काम नीट करत होते. बोलता बोलता एखाद्या हैबतरावाचा हैबतखान सहज करीत होते.....मात्र अशावेळी सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून एका साधूचा आवाज निराळी उपासना शिकवत होता. रामसेवा, रुद्रसेवा आणि शक्तिसेवा समजावून देत होता. लोकांच्या उद्धारासाठी, धर्म संस्थापनेसाठी, पराभूत मनोवृत्ती हालविण्यासाठी एक नवीन गर्जना करीत होता– 'जयजय रघुवीर समर्थ'. शिवबाच्याही कानावर या वैराग्याचे शब्द ऐकू येत होते. आणि शिवबाही नतमस्तक होऊन ते शब्द ऐकत होता...( शिवबा हात जोडून उभा. पाठीमागून श्लोक ऐकू येतात–)

वन्ही तो चेतवावा रे। चेतविताची चेततो।
केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे ॥१॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला ■
जो आपणचि कष्टत गेला। तोचि भला ॥२॥
सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे।
परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे ॥३॥
भाग्यासी काय उणे रे। यत्नावाचूनि राहिले।
यत्न तो देव जाणावा। अंतरी धरिती बरे ॥४॥

(पंत घाईघाईने येतात.)

पंत : राजे, आनंदाची बातमी–

शिवाजी : कसली, पंत ?

पंत : तोरण्याच्या तटाचं काम चालू असतानाच सोन्याचा रांजण सापडला, राजे–

शिवाजी : काय सांगता, पंत !

पंत : होय राजे ! आपल्याला भवानीमातेचं वरदान आहे.

शिवाजी : नुसतं वरदान असून उपयोगी नाही. आताच आमच्या कानांत गुरुमाऊलीचे शब्द अमृतासमान आनंद देत होते. भाग्याशी काय उणे रे–यत्नावाचुनि राहिले. यत्न तो देव

जाणावा—पंत, आपण प्रयत्नाचे पाईक—बाकी भरवसा भवानीमातेवर. सापडलेली संपत्ती नीट ताब्यात घेतलीत ?

पंत : होय राजे. मुरुंबदेवाच्या बांधकामासाठी या संपत्तीचा उपयोग करावा म्हणतो.

शिवाजी : केव्हाही. ही संपत्ती आपल्याला भवानीमातेने स्वराज्यासाठी दिली आहे, असं आम्ही मानतो. तोरणा घ्यायचा आम्ही आमचा मनसुबा आपणाला सांगितला तेव्हाही आम्हाला भवानीमातेने असाच कौल दिला होता. झुंझारमाची आणि बुधलामाची या दोन्ही जागा आमच्या आवडत्या.

पंत : मलाही आपल्या नजरेचं कौतुक वाटतं, राजे.

शिवाजी : काय सांगता, पंत !

पंत : तोरण्यासारखे बरेच बेवसाऊ गड होते, पण तोरण्याला स्वराज्याचं पहिलं तोरण बांधायचा मनसुबा आपण सांगितलात तेव्हाच आम्ही हरलो. राजे, आम्ही हरलो.

शिवाजी : आपण हरलात ! पंत....आमची काही चूक झाली का ?

पंत : नाही राजे—आपणाकडून हार घेण्यासारखा आयुष्यात

दुसरा आनंद नाही. राजे, आमच्या तुमच्या मसलती पाहिल्या की वाटतं–आम्ही खरोखरीच पुण्यावान माणसं म्हणून आपल्या सेवेची संधी आम्हाला मिळाली...नाही – राजे... आपली गरुडझेप दिव्य आहे. आमच्या नजरेत ती सामावणं कठीण. राजे, कालच आम्ही आईसाहेबांशी बोलत होतो, तेव्हा मी त्यांनाही म्हणालो की, आईसाहेब आता आम्हाला सुट्टी द्यावी.

शिवाजी : पंत, काय बोलता तुम्ही !

पंत : राजे...सुखालासुद्धा गालबोट लागू नये. माझं वय झालं. वाढतं वय हे शहाणपणा गमावत चालल्याचं लक्षण. आता पूर्वीच्या बुद्धीनं सांगणं कठीण आणि तुम्हाला शिकवण्या-सारखं माझ्याजवळ आता काही नाही. राजे, आपण सूज्ञ झालात.

शिवाजी : नाही पंत. आम्ही तुम्हाला सोडणार नाही. त्रिवार नाही. आम्हाला तुम्ही हवे आहात. त्या तोरण्याचा किल्ला बघणार कोण ? ते मुरुंबदेवाचं बांधकाम करणार कोण ? तोरण्याच्या तटावर सापडलेलं धन तिथं वापरायचं ना ! ते कोण करणार ?.... तो कुंवारा गड तुम्ही घेणार

आहात ना ?

पंत : नको राजे, आम्ही थकलो.

शिवाजी : नाही पंत. आपण श्रम घेऊ नका. विश्रांती घ्या. आपलं केवळ दर्शन आम्हाला पुरेसं आहे.

पंत : राजे !

शिवाजी : नाही पंत, आम्हाला तुमच्या आशीर्वादाची फार गरज आहे. आणि आम्ही तो हक्काने तुमच्याजवळ मागणार...

( बालशिवाजी आशीर्वादासाठी वाकतो पण पंत त्याला उचलून छातीशी लावतात. प्रवेश संपतो. )



शिक्षक बंधूंनो,

या पुस्तिकेद्वारे मी आपणांस भेटतोय. हा माझा एक प्रयत्न आहे. तो परिपूर्ण नाही याची मला जाणीव आहेच. आपल्या सहकार्यानं त्यात सुधारणा व्हावी अशी इच्छा आहे. आपण कृपया पुढील मुद्यांवर लिहाल का ?

(१) हे पुस्तक कसे वाटले ?

(२) यातील लिखाणाप्रमाणे केलेले प्रयोग यशस्वी झाले का ?

(३) यात कोणती सुधारणा हवी ?

(४) तुम्हाला काय हवे ?

आपण लिहावे. मी जरूर आपल्या बहुमोल सूचनांचा समावेश पुढच्या सेरीजमध्ये करीन.

आपला
श्याम फडके

(वि. सू. शिक्षकांनी मागविलेल्या सेटस्वर व्यापारी कमिशन दिले जाते. माहितीसाठी लिहा.)

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दा. क्र. २६८६ नों. दि. २१.३.१९९०
वि. ना. ना.

मुलांनो,

ही तुमच्यासाठी लिहिलेली सेरीज. ही मी माझ्या शालेय जीवनातल्या अनुभवावरून तयार केलेली आहे. यात तुम्हाला काही अडचण आली असेल तर तुम्ही माझ्या पत्त्यावर जरूर लिहा. मी ती अडचण दूर करण्याचा प्रयत्न करीन.

दुसरं–रंगदेवतेला नमस्कार करा. तिचा, गुरुजींचा आशीर्वाद घ्या. जर माझ्या या पुस्तकातला प्रवेश स्नेहसंमेलन, स्पर्धा, किंवा उत्सवात स्टेजवर करणार असाल तर लेखक मानधन रुपये तीन माझ्या पत्त्यावर पाठवा. ( पोस्टल ऑर्डर पाठवा किंवा मनिऑर्डर पाठवा. ) त्यावेळी पुढील माहिती कळवा.

प्रवेशाचे नाव. करणाऱ्याचे नाव व पत्ता. दिनांक– (प्रयोगाची) जागा.

मी परवानगी पाठवीन. ( परवानगीशिवाय प्रयोग करू नका.)

IRBK-0116868

IRBK-0116868

श्याम फडके
इंदिरा निवास
नौपाडा ठाणे ४० ६०२

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........

मुलांनो,

ही तुमच्यासाठी लिहिलेली सेरीज. ही मी माझ्या शालेय जीवनातल्या अनुभवावरून तयार केलेली आहे. यात तुम्हाला काही अडचण आली असेल तर तुम्ही माझ्या पत्त्यावर जरूर लिहा. मी ती अडचण दूर करण्याचा प्रयत्न करीन.

दुसरं–रंगदेवतेला नमस्कार करा. तिचा, गुरुजींचा आशीर्वाद घ्या. जर माझ्या या पुस्तकातला प्रवेश, स्नेहसंमेलन, स्पर्धा, किंवा उत्सवात स्टेजवर करणार असाल तर लेखक मानधन रुपये तीन माझ्या पत्त्यावर पाठवा. ( पोस्टल ऑर्डर पाठवा किंवा मनिऑर्डर पाठवा. ) त्यावेळी पुढील माहिती कळवा.

प्रवेशाचे नाव. करणाऱ्याचे नाव व पत्ता. दिनांक– (प्रयोगाची) जागा.

मी परवानगी पाठवीन. ( परवानगीशिवाय प्रयोग करू नका.)

IRBK-0116868
IRBK-0116868

श्याम फडके
'इंदिरा निवास'
नौपाडा ठाणे ४० ६०२

## राजचंद्र प्रकाशनाची घोडदौड

बालरंगभूमी–पहिली सेरीज : भाग १ ते ५ (प्रसिद्ध झाली)

( हसतखेळत शिकवलेले नाट्यशास्त्र )

दुसरी सेरीज : भाग ६ ते १० (लवकरच येणार)

तिसरी सेरीज : भाग ११ ते १५ (येणार)

या शिवाय

## चावट चंदूची साहसकथा

सेरीज पहिली – भाग १ ते ५ छापत आहे.

या शिवाय दुसऱ्या अन्य सेरीज

या सर्व साहित्याचे लेखक

**नाटककार श्याम फडके**

प्रत्येक पुस्तकाची किंमत फक्त १ रुपया

पाच रुपये पाठवा आणि बुकपोस्टाने पुस्तके मिळवा.

लिहा

**राजचंद्र प्रकाशन**

C/o श्याम फडके, इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे ४०० ६०२

एक भेट योजना कूपन

# बालरंगभूमी

## दुसरी सेरीज : पाच पुस्तके

**किंमत प्रत्येकी एक रुपया**

**लेखक : श्याम फडके**

श्री. श्याम फडके,

इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे यांस

वि. वि.

मला आपली दुसरी सेरीज पुढील पत्त्यावर बुक-पोस्टाने पाठवून द्यावी. सेरीज तयार झाल्याचे आपले पत्र आल्याबरोबर मी रुपये पाच आपणाकडे मनि-ऑर्डरने पाठवीन.

आपला

पत्ता :

# राजचंद्र प्रकाशन

सुप्रसिद्ध नाटककार श्री. शाम फडके यांच्या लेखणीतून उतरलेली

**बाल रंगभूमी** – पहिली सेरीज – ५ पुस्तकें

**बाल रंगभूमी** – दुसरी सेरीज – ५ पुस्तकें
( आगामी )

**बाल रंगभूमी** – तिसरी सेरीज – ५ पुस्तकें
( आगामी )

**किंमत प्रत्येकी फक्त १ रुपया**

या शिवाय–

**चावट चंदूची साहसकथा** – ५ पुस्तके
( छापत आहे )

**किंमत प्रत्येकी १ रुपया**

# राजचंद्र प्रकाशन

**इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे २**

मुंबईत मिळण्याचे ठिकाण –

## रामकृष्ण बुक डेपो

**गिरगाव मुंबई ४**



कव्हर – सर्वोदय प्रिंटर्स, मुंबई ४